**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २५० । शुक्रवार ३ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## मढी फाटा येथे गांजासह एकाला अटक

### एलसीबी व कोपरगाव पोलिसांच्या कारवाईत १ लाख ६ हजारांचा मुद्देमाल जप्त



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखा आणि कोपरगाव तालुका पोलिसांनी मढी फाटा येथे गांजाची विक्री करणाऱ्या एका आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून एकूण १ लाख ६ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दत्तू रतन महाजन (वय ४५, रा. सुरेगाव, ता. कोपरगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व त्यांच्या अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, दत्तू महाजन हा नाशिक येथील दोन अनोळखी इसमांकडून गांजा मागवून तो विक्री करणार आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड व त्यांच्या पथकासह मढी फाटा येथे सापळा रचला.

यादरम्यान कोळपेवाडीकडून एका मोटारसायकलवर दोन संशयित आले. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच मोटारसायकलवरील दोघे जण पळून जाण्यात यशस्वी झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून दत्तू महाजन याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे असलेल्या पिशवीत ४ किलो २५० ग्रॅम अंमली पदार्थ गांजा आढळला. पोलिसांनी १ लाख ६ हजार २५० रुपये किमतीचा गांजा आणि ५०० रुपयांचा मोबाईल असा एकूण १ लाख ६ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस नाईक भीमराज खर्से यांच्या फिर्यादीवरून कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क) आणि २०(ब)(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कोपरगाव तालुका पोलीस करीत आहेत.

## ‘नो पार्किंग’च्या नावाखाली बेकायदेशीर दंडवसुलीचे रॅकेट?

### फौजदारी कारवाई करा । सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी





**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या पे-अँड-पार्क नो पार्किंग व्यवस्थापनामध्ये नियमाचा उल्लंघन, निविदा प्रक्रियेत फेरफार, शासन महसुलाचे संभाव्य नुकसान, खासगी ठेकेदाराला कायद्याविरुद्ध अधिकार बहाल करणे, रॉयल्टीत मोठी कपात करून आर्थिक लाभ मिळवून देणे, पोलीस विभागाच्या जागेचा वापर नागरिकांकडून दंड व टोईंग शुल्काच्या नावाखाली सुरू असलेल्या वसुलीप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (एसीबी) उच्चस्तरीय चौकशीची मागणी सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी केली आहे.


यासंदर्भात नगर विकास विभाग, गृह विभाग, पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस अधीक्षक यांच्याकडे सविस्तर निवेदन देण्यात आली आहे. ७ मार्च २०२४ रोजी कार्यारंभ आदेश देऊन शहरातील पे-अँड-पार्क व्यवस्थापनासाठी पाच वर्षांचा करार मे. दिग्विजय एंटर प्रायझेस, नाशिक या संस्थेशी केला. मूळ करारानुसार पहिल्या वर्षी ३ लाख, दुसऱ्या वर्षी ३.७५ लाख, तिसऱ्या वर्षी ४.५० लाख, चौथ्या वर्षी ५ लाख आणि पाचव्या वर्षी ५.५० लाख अशा एकूण २१ लाख ७५ हजार रुपयांची रॉयल्टी महानगरपालिकेला मिळणार होती. निविदेमध्ये शहरातील एकूण ३६ शुल्क वाहनतळ व रस्ते समाविष्ट करण्यात आले रस्त्यांवर अंदाजे ४,१०० दुचाकी व १,५७० चारचाकी वाहने पार्क होतील.

या आधारावर निविदेची आर्थिक रचना निश्चित करण्यात आली होती. मूळ निविदेच्या अटी अस्तित्वात असतानाच श्री. यशवंत डांगे यांनी प्रशासकीय स्थायी समितीचा ठराव क्रमांक ६८२, दिनांक १२ डिसेंबर २०२५ मंजूर करून ठेकेदाराकडून महानगरपालिकेला मिळणाऱ्या रॉयल्टीमध्ये मोठी कपात केली. सुधारित दरानुसार पहिल्या ■ पान ४ वर

#### पुणे नासिक हायस्पीड रेल्वे मार्गासाठी

## राज्य सरकार सकारात्मक, तज्ञ समितीचा अहवाल मागवणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शिष्टमंडळाला ग्वाही राहुरी शनिशिंगणापूर रेल्वे मार्गाचे निवेदन सादर



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे मार्ग पहिल्या आरखड्यानुसार कार्यान्वित करण्यासाठी राज्यसरकार सकारात्मक असून, यासाठी तज्ज्ञ समितीकडून अहवाल मागवून प्रस्तावित रेल्वे मार्गाबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकप्रतिनिधींच्या शिष्टमंडळास दिली.

पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे मार्ग पहिल्या प्रस्तावित आराखड्यानुसार कार्यान्वित व्हावा या मागणीसाठी जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने अहिल्यानगर, पुणे आणि नाशिक या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून या मार्गाबाबत सविस्तर चर्चा केली. माजी मंत्री आ.दिलीप वळसे पाटील, आ.डॉ. किरण लहामटे, आ.सरोज अहिरे, आ.अमोल खताळ, आ.शरद सोनवणे, आ.बाबाजी काळे या प्रसंगी उपस्थित होते.

शिष्टमंडळाने पुणे-नाशिक रेल्वे ■ पान ४ वर

## तहसील कार्यालयात महिला शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न; वेळेवर हस्तक्षेपाने अनर्थ टळला

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** पैठण तहसील कार्यालयात शुक्रवारी दुपारी एक धक्कादायक घटना घडली. कारकीन (ता. पैठण) येथील महिला शेतकरी शोभा बबन कुदळे यांनी तहसील कार्यालयाच्या भिंतीवर चढून सौर दिव्याच्या खांबाला साडी बांधत गळफास घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी तहसीलदार व उपविभागीय अधिकारी (एसडीएम) कार्यालयात उपस्थित होते. घटनेची माहिती मिळताच तहसील कार्यालयातील कर्मचारी, पोलिस आणि उपस्थित नागरिकांनी तातडीने धाव घेत महिलेला सुरक्षित खाली उतरवले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेमुळे काही काळ तहसील कार्यालय परिसरात खळबळ उडाली. ■ पान ४ वर

## ‘आरोप पत्रातून नाव वगळले’ तपासी अंमलदार यांचे स्पष्टीकरण बोलावले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** लाल टाकी भारस्कर कॉलनी अहमदनगर येथील रहिवासी सुशीला साहेबराव काते व तिचे कुटुंबातील व्यक्तींना आरोपी ममता रवी मिसाळ ,सोनाबाई येडु काते, ज्योती रवी मिसाळ व रवी मधुकर मिसाळ यांनी दिनांक १०ऑगष्ट २०२३रोजी सकाळी ९ वाजता घरात घुसून मारहाण केली म्हणून तोफखाना पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ११३८/२०२३ भा.द.वि.कलम कलम ४५२,३२३,५०४,५०६,१४३, १४७ , १४९ मधील गुन्ह्यात फिर्यादी सुशीला साहेबराव काते हिने दिलेल्या फिर्यादीत चार आरोपींचे नाव नमूद असताना आरोप पत्र दाखल करतानी सदर पुण्यातील तपशी अंमलदार पोलीस हेडकॉन्स्टेबल एस बी आंधळे यांनी चक्क एका आरोपीचे नाव (रवी मधुकर मिसाळ )याचे नाव कोणतेही संयुक्तिक कारण न देता वगळले म्हणून मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब ■ पान ४ वर

## अहिल्यानगर शहरात मोकाट कुत्र्यांची दहशत; एकाच दिवशी ३८ नागरिकांना चावा

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर यांच्या दालनात तीव्र आंदोलन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शहरामध्ये मोकाट कुत्र्यांचा प्रचंड सुळसुळाट झाला असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. काल एकाच दिवशी शहरातील तब्बल ३८ नागरिकांना पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतल्याने संपूर्ण शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे. महानगरपालिकेकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्यामुळे मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी महापालिकेने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

ते म्हणाले की, मागील महासभेमध्ये मोकाट कुत्र्यांचा विषय मांडण्यात आला होता. त्यानंतर प्रशासनाने तातडीने कारवाई करणे अपेक्षित होते; मात्र प्रत्यक्षात कोणतीही प्रभावी उपाययोजना झालेली दिसून येत नाही. सर्व काम केवळ कागदोपत्री सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा प्रश्न विशेष बाब म्हणून पुढील महासभेच्या अजेंड्यावर घेण्यात यावा, अशी मागणी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

नागरिकांच्या प्रश्नांसाठी लोकांना महापालिकेत आंदोलन करण्याची वेळ येऊ नये. त्यापूर्वीच प्रशासनाने ठोस आणि परिणामकारक उपाययोजना करणे आवश्यक आहे, असेही संपत बारस्कर यांनी स्पष्ट केले. या गंभीर प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर यांच्या दालनात तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक बाळासाहेब पवार, महेश तवले, अजिंक्य बोरकर, मयूर बांगरे, वैभव ढाकणे, सुशांत जाधव, सुरज कोतकर, दीपक खेडकर, जॉय लोखंडे, सागर गुंजाळ, सुरज शिंदे, भाऊ बारस्कर, ■ पान ४ वर

## पारनेर-नगर मतदारसंघातील सिंचन प्रकल्पांना गती

### आमदार दातेंच्या मागणीनुसार मंत्रालयात आढावा बैठक



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर –**पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित सिंचन व कालवा विकास कामांना गती देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. आमदार दाते यांनी जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे मतदारसंघातील महत्त्वाच्या सिंचन प्रकल्पांच्या कामांचा स्वतंत्र आढावा घेण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीची तात्काळ दखल घेत मंत्री महोदयांनी मंत्रालयात संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावून प्रत्येक कामाचा सविस्तर आढावा घेत आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी जलसंपदा विभाग सचिव एकनाथ डवले, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत दादा गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, कार्यकारी संचालक धुमाळ साहेब, मुख्य अभियंता चोपडे साहेब, अधिक्षक अभियंता अलका अहिरराव, अधिक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता गणेश नान्नोर, कार्यकारी अभियंता जगदिश पाटील, कार्यकारी अभियंता बरकले इ. अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत पिंपळगाव जोगा डावा ■ पान ४ वर

## आषाढी वारीनिमित्त जिल्ह्यात हजारो वारकऱ्यांसाठी चरणसेवा उपक्रम !

### मुख्यमंत्री साहाय्यता निधीच्या माध्यमातून १० ते १७ जुलैदरम्यान मोफत चरणसेवा अभियान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आषाढी वारीदरम्यान पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या हजारो वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा, आयुर्वेदिक पद्धतीने पायांची मालिश तसेच अल्पोपहार उपलब्ध करून देण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यात मुख्यमंत्री साहाय्यता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या वतीने चरणसेवा उपक्रम २०२६ राबविण्यात येणार असल्याची माहिती अहिल्यानगर मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रेहान शाह यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मंत्रालयातील मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाचे प्रमुख डॉ. रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या समन्वयातून जिल्हा प्रशासनाकडून या उपक्रमासाठी आवश्यक नियोजन व सहकार्य करण्यात आले आहे.

हा विशेष उपक्रम १० ते १७ जुलै २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील विविध पालखी मार्गांवर तसेच विसावा स्थळांवर आयोजित करण्यात येणार आहे. डॉ. विखे पाटील मेडिकल कॉलेज, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय आणि शेवगाव येथील श्री एकनाथ आयुर्वेद रुग्णालयातील शेकडो वैद्यकीय विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून या उपक्रमात सेवा देणार आहेत.

सरला बेट येथील गंगागिरी महाराज दिंडी, ताहराबादची महिपती महाराज दिंडी, शिर्डीची श्री साईबाबा दिंडी तसेच अमळनेरच्या संत सखाराम महाराज दिंडीसह २२ हून अधिक प्रमुख पायी दिंड्यांतील सुमारे ८ हजार ६०० वारकऱ्यांना या उपक्रमाचा थेट लाभ मिळणार आहे. सततच्या पायी प्रवासामुळे वारकऱ्यांच्या पायांवर येणारा ताण कमी करण्यासाठी वातशामक आयुर्वेदिक तेलाचा वापर करून स्वयंसेवकांकडून पायांची मालिश करण्यात येणार आहे.

उपक्रमाअंतर्गत वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, आवश्यक वैद्यकीय सल्ला, विश्रांतीची सुविधा तसेच सकाळ, दुपार आणि संध्याकाळच्या सत्रानुसार चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. स्वयंसेवकांना टी-शर्ट, हातमोजे व मास्क उपलब्ध करून देण्यात आले असून वारकऱ्यांसाठी खुर्च्या आणि चटयांची व्यवस्था करण्यात आली आहे.

या सर्व व्यवस्थेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्थांचेही सहकार्य लाभत आहे. निवडक ठिकाणी आरोग्य जनजागृती रथ आणि रुग्णवाहिका सेवा सज्ज ठेवण्यात येणार असून संसर्गजन्य आजारांपासून बचाव, वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्यविषयक काळजी याबाबत वारकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध समन्वयकांची नियुक्ती संबंधित वैद्यकीय महाविद्यालयांमार्फत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध शिबिरांच्या नियोजन व समन्वयाची जबाबदारी हेमंत झेंडे, डॉ. समीर होळकर, देवराव चित्ते, । ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### ६ जुलैपासून योगासन-प्राणायाम प्रशिक्षण वर्ग

अहिल्यानगर - निरोगी शरीर, प्रसन्न मन आणि संतुलित जीवनशैली घडविण्यासाठी योगाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर सिद्धी बाग परिसरातील दत्तू खलिफा व्यायाम शाळेच्या वरील योग हॉलमध्ये सोमवार, दि. ६ जुलै २०२६ पासून दि. १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत योगासन व प्राणायाम प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व वयोगटातील महिला व पुरुषांसाठी हे प्रशिक्षण खुले असून नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.या प्रशिक्षण वर्गाचे मार्गदर्शन प्रशिक्षित योगशिक्षिका पूजा गांधी करणार आहेत. योगशास्त्रातील विविध आसने, सूर्यनमस्कार, शरीर सुदृढ ठेवण्यासाठी आवश्यक पूरक हालचाली तसेच विविध प्रकारचे प्राणायाम यांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण या वर्गामध्ये दिले जाणार आहे. प्रत्येक सहभागीला प्रत्यक्ष सराव करून घेत वैयक्तिक मार्गदर्शनही करण्यात येणार असल्याने नवशिक्या तसेच नियमित योगाभ्यास करणाऱ्यांनाही या वर्गाचा लाभ होणार आहे. नियमित योगाभ्यासामुळे शरीराची लवचिकता वाढण्याबरोबरच मानसिक ताणतणाव कमी होण्यास, श्वसनक्रिया सुधारण्यास, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास आणि दैनंदिन जीवन अधिक उत्साही व निरोगी बनविण्यास मदत होते. त्यामुळे सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत योगाचा अंगीकार करण्याची गरज अधिक अधोरेखित होत आहे. सहभागींच्या सोयीचा विचार करून सकाळी ६ ते ७, ७ ते ८ तसेच दुपारी ४ ते ५ आणि ५ ते ६ अशा चार स्वतंत्र बॅचचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थी, नोकरदार, गृहिणी तसेच ज्येष्ठ नागरिकांना आपल्या वेळेनुसार बॅचची निवड करता येणार आहे. या योगासन-प्राणायाम प्रशिक्षण वर्गात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी अधिक माहितीसाठी मो. ९४२३९६२९४० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

### जिल्हा हमाल पंचायतच्या उपाध्यक्षपदी मधुकर केकाण यांची तर सचिवपदी संजय महापुरे



अहिल्यानगर - जिल्हा हमाल पंचायतच्या कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत संघटनेच्या विविध पदांवर नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये उपाध्यक्ष पदी मधुकर धर्मा केकाण यांची जिल्हा तर सचिव पदी संजय वैजीनाथ महापुरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नव्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीमुळे उपस्थित कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करत टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले.बैठकीच्या अध्यक्षस्थानी अविनाश हरिभाऊ घुले होते. यावेळी उपाध्यक्ष म्हणून मा. श्री. गोविंद पंढरीनाथ सांगळे व शेख रज्जाक शेखलाल, यांच्यासह संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांनी बैठकीत सहभाग घेतला. संघटनेची पुढील वाटचाल, कामगारांचे प्रश्न, संघटन वाढ आणि विविध उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी अध्यक्ष अविनाश घुले यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, ''हमाल हा समाजाच्या अर्थव्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यांच्या श्रमामुळे बाजारपेठा, कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि विविध उद्योगाची चाके सुरळीत फिरतात. त्यामुळे हमालांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटना अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने संघटनेच्या बळकटीसाठी प्रामाणिकपणे काम करावे आणि माथाडी कामगार यांच्या समस्या प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचवाव्यात.''पुढे बोलताना घुले म्हणाले, ''नवीन पदाधिकाऱ्यांवर संघटनेने मोठी जबाबदारी सोपविली आहे. सर्वांनी एकजुटीने काम करून हमालांच्या कल्याणासाठी शासनाच्या विविध योजना तळागाळातील कामगारांपर्यंत पोहोचवाव्यात. संघटनेची ताकद ही कार्यकर्त्यांच्या एकोप्यात असते. त्यामुळे मतभेद बाजूला ठेवून कामगार हिताला प्राधान्य देत संघटना अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे.''नवीन उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर मधुकर केकाण यांनी संघटनेने दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले.

# आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**चांदबिबी महालाची सहल घडवून केले वृक्षारोपण; हरदिन मॉर्निंग ग्रुपचा सामाजिक स्नेहमेळावा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा संगम घडवून आणणारा हरदिन मॉर्निंग ग्रुपचा २६ वा स्नेहमेळावा ऐतिहासिक चांदबिबी महाल परिसरात उत्साहात पार पडला. या स्नेहमेळाव्यानिमित्त वीरभद्र आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी निसर्गरम्य आणि ऐतिहासिक चांदबिबी महाल परिसराची शैक्षणिक सहल घडविण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

विशेष म्हणजे, शासनाचे कोणतेही अनुदान नसलेल्या वीरभद्र आश्रम शाळेत ग्रामीण व गरजू कुटुंबांतील मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उद्देशाने हरदिन मॉर्निंग ग्रुपने हा सामाजिक उपक्रम राबविला. तसेच यावेळी ग्रुपच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांसह स्वच्छता अभियान राबविले. कार्यक्रमादरम्यान चांदबिबी महाल परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. ''एक सदस्य एक वृक्ष'' या संकल्पनेतून प्रत्येकाने पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमास गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप, शहर बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिक विधाते यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच सीए रवींद्र कटारिया, अभिजीत खोसे, सचिन चोपडा, राजू चंगेडिया, जयराम मेहतानी, चुनीलाल झंवर, हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, प्रांजली सपकाळ, जयश्रीताई पोटे, संगीता सपकाळ, मनीषा शिंदे, वैशाली वराट, सारिका पवार, सुनीता बनकर, ॲड. मनीषा बेरड, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, अशोक पराते, दिलीप ठोकळ, ताराचंद ठोकळ, सचिन पेंढुरकर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, विलास आहेर, प्रल्हादराव बनकर, सुनील गुरव, सुभाष पेंढुरकर, सचिन कर्डिले, बाळासाहेब बेरड, ईवान सपकाळ, आशाताई पराते, उषाताई ठोकळ, शााहिन सय्यद, चंद्रकला पालवे, अभिजीत सपकाळ, वीरभद्र आश्रम शाळेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. मिलिंद फुंदे, मुख्याध्यापक प्रकाश शिंदे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांनी ग्रुपच्या सामाजिक वाटचालीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, ''सशक्त समाज घडविण्याचा पाया शिक्षणात आहे. त्यामुळे पर्यावरण आणि आरोग्य चळवळीबरोबरच गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सातत्याने मदतीचा हात पुढे करणे ही हरदिन मॉर्निंग ग्रुपची परंपरा आहे. विद्यार्थ्यांना आनंदी वातावरणात शिक्षणाची प्रेरणा मिळावी म्हणून ऐतिहासिक व निसर्गरम्य स्थळाची सहल आयोजित करून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रत्येक सदस्य आपला वाढदिवस वृक्षारोपण करून आणि त्या वृक्षाचे संवर्धन करून साजरा करतो. हीच खरी समाजाप्रती आपली बांधिलकी असल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रियांशी मृत्यूची व गर्भवती महिलेच्या फरपट प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करावी - आमदार दाते



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** राज्यातील आरोग्य व्यवस्थेतील निष्काळजीपणामुळे सर्वसामान्य नागरिकांना जीव गमवावा लागत असल्याच्या गंभीर पार्श्वभूमीवर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशन (जून-जुलै २०२६) मध्ये औचित्याच्या मुद्द्यावर दोन अत्यंत वेदनादायी घटनांचा विषय सभागृहात मांडत शासनाचे लक्ष वेधले.

आमदार दाते यांनी सुपा (ता. पारनेर) येथील अवघ्या सहा वर्षीय प्रियांशी बागडे हिच्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित करत, डोळ्याच्या तिरळेपणावरील शस्त्रक्रियेसाठी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या प्रियांशीचे सर्व वैद्यकीय अहवाल सामान्य असतानाही, शस्त्रक्रियेपूर्वी डोळ्यात औषधी ड्रॉप टाकल्यानंतर तिची प्रकृती अचानक बिघडून रक्ताच्या उलट्या झाल्या आणि तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करण्याची त्यांनी मागणी केली.

याचबरोबर राळेगण थेरपाळ (ता. पारनेर) येथील एका गर्भवती महिलेची झालेली फरपटही त्यांनी सभागृहात मांडली. निघोज ग्रामीण रुग्णालयातून जिल्हा रुग्णालय, तेथून छत्रपती संभाजीनगर, पुढे मुंबईतील केईएम रुग्णालय आणि अखेरीस वाडिया बालरुग्णालय असा जीवघेणा प्रवास करत आई आणि नवजात बालकाला प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. आरोग्य यंत्रणेतील समन्वयाच्या अभावामुळे नागरिकांची होत असलेली ही गैरसोय अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या दोन्ही घटनांची शासनाने उच्चस्तरीय समितीमार्फत सखोल चौकशी करावी, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आरोग्य व्यवस्थेत प्रभावी सुधारणा कराव्यात, अशी ठाम मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी सभागृहात केली.

# एफडीएच्या अफवेने पैठणमध्ये अनेक दुकाने बंद; अधिकारीच आले नव्हते

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरात अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाचे अधिकारी तपासणीसाठी येणार असल्याची अफवा शुक्रवारी

सकाळपासून पसरली. या अफवेनंतर शहरातील अनेक दुकानदारांनी खबरदारीचा उपाय म्हणून आपली दुकाने बंद ठेवली. त्यामुळे दिवसभर शहरात चर्चांना उधाण आले.

दुकाने बंद असल्याने ग्राहकांची काही प्रमाणात गैरसोय झाली. दरम्यान, सायंकाळपर्यंत झालेल्या पडताळणीत एफडीएचे अधिकारी शहरात आलेच नसल्याची माहिती समोर आली. त्यामुळे शहरात पसरलेल्या चर्चा केवळ अफवाच असल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. अफवांवर विश्वास न ठेवता संबंधित विभागाकडून अधिकृत माहितीची खातरजमा करावी, असे आवाहन जाणकारांकडून करण्यात येत आहे. तसेच भविष्यात अशा अफवा पसरविणाऱ्यांवर योग्य कारवाई करून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

# आक्रमक अकरा मराठा इन्फट्रिचा ४८ वा रेझिंग डे उत्साहात साजरा

**आक्रमक अकरा मराठा युनिटचे देशसेवेच्या कार्यात मोठे योगदान – डॉ.सोमेश्वर गायकवाड**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**''आक्रमक अकरा मराठा इन्फट्रिचा''४८ वा रेझिंग डे अहिल्यानगर मध्ये मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला आहे.देशसेवेच्या कार्यात आक्रमक अकरा युनिटचे मोठे योगदान आहे.स्नेह मेळाव्याच्या माध्यमातून सर्व माजी सैनिक व परिवार एकत्रित आल्याचा आनंद होत आहे.निवृत्तीनंतर सर्वांनी आपल्या आरोग्याची नियमितपणे काळजी घ्यावी. प्रत्येक वर्षी प्राथमिक आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे. सेवानिवृत्ती नंतरही एकजूट राहिले तर माजी सैनिकांचे प्रश्न सुटतील.देशसेवा सोबतच सामाजिक कार्यातही माजी सैनिक आघाडीवर आहेत.असे प्रतिपादन कर्नल डॉ. सोमेश्वर गायकवाड यांनी केले आहे.



संभाजी नगर रोड येथील हॉटेल आकाश येथे ''आक्रमक अकरा मराठा इंफट्री'' चा ''४८ वा रेझिंग डे''मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी सर्व माजी सैनिक सहपरिवार उपस्थित होते.या कार्यक्रमाला स्नेह मेळाव्याचे स्वरूप प्राप्त झाले होते.तसेच यावेळी देशभक्ती पर गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत कर्नल डॉ.सोमेश्वर गायकवाड यांच्यासह सुभेदार दत्तात्रय येणारे,सुभेदार महादेव कोतकर,कॅप्टन सखाराम शिंदे, सुभेदार मोहन दुसुंगे, सुभेदार मोहन शिंदे,सुभेदार बापू साठे, सुभेदार संदिप ठोकळ, सुभेदार मच्छिंद्र येवले,विलास शेळके, रोहिदास मापारी,कुंडलिक चेमटे बाबासाहेब निक्रड,वाल्मीक ओहोळ,दिलीप शेळके, विनायक जरे,दादाभाऊ जपकर,मंगेश गलगते,परमेश्वर कासार,संदीप कळमकर अशोक फुलसौंदर,संदीप शिर्के, अविनाश साठे,रंगनाथ मगर,भीमराव बनसोडे,अमोल ठुबे, रामदास ठुबे,संजय डोईफोडे, ज्ञानेश्वर नवथर,दत्ता धायगुडे, दीपक मुळे,संतोष करपे,राजेंद्र गांजुरे आदींसह माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉन पूर्ण करणाऱ्या शहरातील धावपटूंचा गौरव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** इन्फिनिटी सायकलिंग अकॅडमी, बाईक टेक पॉईंट आणि इन्फिनिटी सायकलिंग कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने दक्षिण आफ्रिकेत नुकत्याच पार पडलेल्या जगप्रसिद्ध आणि अत्यंत खडतर समजल्या जाणाऱ्या कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉन २०२६ स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून परतलेल्या अहिल्यानगरच्या धावपटूंचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. जागतिक स्तरावरील या प्रतिष्ठित स्पर्धेत शहराचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा विश्वात उज्ज्वल करणाऱ्या धावपटूंचा सत्कार करण्यात आला.

दक्षिण आफ्रिकेतील डरबन ते पीटरमारित्झबर्ग या दोन शहरांदरम्यान पार पडलेल्या ८५.७७ किलोमीटर अंतराच्या कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये अहिल्यानगरचे डॉ. अमित बडवे, जस्मित वधवा, सुनील बनकर, डॉ. संकेत मुंदडा आणि सचिन राणे यांनी यशस्वीरित्या शर्यत पूर्ण करत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या यशाबद्दल विशेष सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविकात संभाजी मोहिते यांनी शहरात आरोग्य चळवळ वेगाने रुजत असल्याचे सांगितले. सायकलिंग आणि धावण्याकडे युवक-युवती मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत असून सकाळच्या व्यायामाची सवय वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. शहरातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे सायकलपटू घडावेत, या उद्देशाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. नुकत्याच जागतिक सायकल दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.

# अहिल्यानगरचे 'शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान-२०२६' राज्यासाठी दिशादर्शक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ आणि जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुख्याध्यापक कार्यशाळेत शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे यांनी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान-२०२६' या उपक्रमाचे विशेष कौतुक करत, हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रासाठी दिशादर्शक व अनुकरणीय ठरेल, असे गौरवोद्गार काढले. जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी मुख्याध्यापक संघाने केलेले नियोजन आणि शिक्षण विभागाच्या समन्वयातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची त्यांनी प्रशंसा केली.

कार्यशाळेला जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील मुख्याध्यापक, शिक्षण विभागातील अधिकारी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या विविध योजना, प्रशासकीय बदल, डिजिटल प्रणाली आणि गुणवत्तावाढीच्या उपक्रमांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे म्हणाले की, बदलत्या शैक्षणिक व्यवस्थेत मुख्याध्यापकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासनातील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास यासाठी मुख्याध्यापकांनी नेतृत्वक्षम भूमिका बजावणे आवश्यक आहे. गुणवत्ता, शिस्त, नियोजन आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांचा समन्वय साधल्यास शिक्षण क्षेत्रात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करताना प्रत्येक मुख्याध्यापकाने जबाबदारीची जाणीव ठेवून प्रामाणिकपणे काम करावे. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच मूल्यशिक्षण आणि अनुशासनाची जपणूक होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान-२०२६ हा उपक्रम केवळ अहिल्यानगरपुरता मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रासाठी मार्गदर्शक ठरेल. शिक्षक, मुख्याध्यापक, पालक आणि शिक्षण विभाग यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम केल्यास शिक्षणाची गुणवत्ता निश्चितच उंचावेल. प्रत्येक शाळेने आपल्या परिसरात गुणवत्ता चळवळ उभी करून उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. मोरे यांनी इयत्ता अकरावी-बारावी प्रवेश प्रक्रिया, विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक उपस्थिती, सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा, ऑनलाईन प्रस्ताव, पोस्ट क्रिएशन, यू-डायस, सरळ प्रणाली, तसेच विविध प्रशासकीय कामकाजाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. दैनंदिन कामकाज नियमित, शिस्तबद्ध आणि वेळेत पूर्ण करण्याबरोबरच स्वीकारलेले कार्य आनंदाने, प्रामाणिकपणे आणि चिकाटीने पूर्ण करण्याचा संदेश त्यांनी दिला.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (✻ पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### रामाशंकर कनोजिया स्मृती ७-अ-साईड फुटबॉल स्पर्धेला प्रारंभ



अहिल्यानगर - कै. रामाशंकर कनोजिया (बाटा) स्मृती ७-अ-साईड फुटबॉल स्पर्धेचा शुभारंभ अहिल्यानगर येथील भुईकोट किल्ला मैदानावर उत्साहात झाला. किल्ला व्हॉलीबॉल सदस्य आणि सुमन एंटरप्रायजेस फुटबॉल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन () च्या मान्यतेने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष खालिद सय्यद, संयुक्त सचिव प्रदीप जाधव व व्हिक्टर जोसेफ, तसेच कार्यकारिणी सदस्य राजू पाटोळे व जेव्हिअर स्वामी आदींसह कनोजिया परिवारातील सर्व सदस्य व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्पर्धेत २४ संघांनी सहभाग नोंदविला असून, जिल्ह्यातील फुटबॉलप्रेमींसाठी ही स्पर्धा आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. उद्घाटनाच्या दिवशी झालेल्या सामन्यांमध्ये सुमन एंटरप्रायजेस एफसीने तक्षिला हायस्कूल संघाचा २-१ असा पराभव केला. तर आयएफसी संघाने फिरोदिया शिवाजियन्स अकादमीवर २-० असा विजय मिळविला. अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या वतीने आयोजकांचे अभिनंदन करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यात फुटबॉलच्या विकासासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मत मानद सचिव रोनप फर्नांडिस यांने व्यक्त केले. सर्व सहभागी संघांना त्यांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी राजेश बैद, नंदू लालबोंद्रे, जावेद शेख, फारुख शेख, प्रसाद हराळे, संकेत बनसोडे, आकाश चिंचिने, आसिफ शेख, विलास शेळार, वैभव मनोदिया, शशांक वाल्मिकी, ऋषी पाटोळे, दाऊद शेख, सुमित राठोर आणि प्रकाश कनोजिया यांनी विशेष परिश्रम घेतले.

### कर्ज मंजूर होऊनही वितरणास विलंब; भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण




अहिल्यानगर - जिल्हा उद्योग केंद्रामार्फत मंजूर झालेले कर्ज प्रकरण महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या मढी शाखेकडून विनाकारण प्रलंबित ठेवण्यात येत असल्याचा आरोप करत भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. अक्षय कानिफ साळवे यांनी जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून दहा लाखांचे कर्ज प्रकरण मंजूर करून महाराष्ट्र ग्रामीण बँक, मढी शाखेकडे पाठविण्यात आले असल्याचे सांगितले. मात्र, मागील महिनाभर सातत्याने बँकेत पाठपुरावा करूनही कर्ज मंजुरीची प्रक्रिया जाणीवपूर्वक लांबविली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.साळवे यांनी निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा उद्योग केंद्राने त्यांच्या कर्ज प्रकरणास मंजुरी देत बँकेकडे शिफारस केली आहे. योजनेनुसार जिल्हा उद्योग केंद्राकडून २ लाखांचे बीज भांडवल मिळणार असून लाभार्थ्याकडून ५ टक्के मार्जिन मनी जमा केली जाणार आहे. उर्वरित रक्कम बँकेने मंजूर करून संमतीपत्र ( ) जिल्हा उद्योग केंद्राकडे पाठविणे अपेक्षित आहे. त्यानंतर बीज भांडवल लाभार्थ्याच्या खात्यात जमा होणार आहे.रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार अशा कर्ज प्रस्तावांवर निर्धारित कालावधीत निर्णय घेणे आवश्यक असतानाही बँक प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच शाखा व्यवस्थापकांकडून असहकार्याची व धमकीची वागणूक मिळत असल्याचाही दावा निवेदनात करण्यात आला आहे. आपण मागासवर्गीय मातंग समाजातील असल्यामुळे कर्ज मंजुरीमध्ये भेदभाव केला जात असल्याचा गंभीर आरोपही साळवे यांनी केला. संबंधित कर्ज प्रकरण तातडीने मंजूर करून न्याय द्यावा, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आमरण उपोषण अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.या उपोषणात भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव शंकर काते यांच्यासह अक्षय साळवे, कानिफ साळवे, संगीता साळवे, ऐश्वर्या साळवे, वैभव साळवे, सविता साळवे, बशीर शेख, ओमकार साळवे आदी सहभागी झाले होते.

# नशा ही एका व्यक्तीबरोबरच कुटुंबाचा नाश करते - निमसे

## डॉ.एन.जे.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे नशा मुक्त भारत जनजागृती रॅली संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** आपला भारत हा तरुणांचा देश आहे. या तरुणांच्या हातात देशाचे भविष्य आहे. पण हाच तरुण वर्ग व्यसनाधीनता आजाराच्या विळख्यात सापडत आहे.नशा ही एका व्यक्तीबरोबरच संपूर्ण कुटुंबाचा नाश करते. तरुणांना व्यसनापासून दूर राहण्यासाठी योग्य शिक्षण, समुपदेशनाची गरज असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा. गणेश निमसे यांनी केले आहे.

वसंत टेकडी येथील डॉ.एन.जे.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना () विभागाच्या वतीने तथा समाज कल्याण विभाग, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने नशा मुक्त भारत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे,प्राचार्य डॉ.श्याम पंगा, प्राचार्य डॉ.अनुराधा चव्हाण, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करून निरोगी, सुदृढ व व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संदेश या रॅलीद्वारे देण्यात आला.

रॅलीचा शुभारंभ श्रीराम चौक येथून झाला. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीविषयी घोषणाबाजी करत तसेच जनजागृतीपर फलक हातात घेऊन नागरिकांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. श्रीराम चौकपाईपलाईन रोडडीमार्ट चौक या मार्गावरून रॅली काढण्यात आली.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ.पंकज आशिया (), जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.मुम्मका सुदर्शन () तसेच समाज कल्याण विभागाचे अधिकारी श्री. देविदास कोकाटे साहेब यांनी कार्यक्रमास पूर्वपरवानगी देऊन शुभेच्छा दिल्या.

प्रा.निमसे पुढे म्हणाले विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त भारताच्या निर्मितीसाठी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून जनजागृतीचे कार्य सातत्याने करावे.

कार्यक्रमास विभागप्रमुख डॉ. वेणू कोला, डॉ. रोशनी सूर्यवंशी, डॉ.प्रसाद घुगरकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय तारडे, प्रा.स्वाती कडनोर यांनी यावेळी रॅलीचे चोख नियोजन करून

कार्यक्रमाच्या माध्यमातून ''नशेला नकार,आरोग्याला होकार'' हा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. व्यसनमुक्त, निरोगी व सशक्त भारताच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या जनजागृती रॅलीसाठी बुधवंत स्किन अँड हेअर क्लिनिक, एशियन फार्मसी, मॅक-केअर हॉस्पिटल, वरद नेत्रालय, सौरभ ट्रॅव्हल्स, श्री प्रकाश ट्रॉफीज, ए.एस.जिम, भंडारी क्लॉथ स्टोअर्स, न्यू अनंत कलेक्शन, भारत केमिकल्स आणि ऑस्टिऑन हॉस्पिटल यांनी प्रायोजक म्हणून सहकार्य केले.

## 'प्लास्टिकला नकार, पर्यावरणाला स्वीकार'चा संदेश

**। स्नेहबंधतर्फे प्लास्टिक मुक्ती दिनानिमित्त जनजागृती**

**। सीईओ पल्लवी विजयवंशी यांचे पर्यावरण संरक्षणाचे आवाहन**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ३ जुलै आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्ती दिन निमित्त स्नेहबंध सोशल फौंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने ''प्लास्टिकला नकार पर्यावरणाला स्वीकार'' या संदेशावर आधारित जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी छावणी परिषद कार्यालयात जनजागृती पोस्टरचे अनावरण छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी म्हणाल्या, ''एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकमुळे पर्यावरणासह मानवी आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहेत. प्लास्टिकचा वापर कमी करून कापडी पिशव्यांचा व पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करणे ही आजच्या काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने प्लास्टिकमुक्त समाज घडविण्यासाठी स्वतःपासून सुरुवात केल्यास पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक प्रभावी ठरेल.

यावेळी डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, ''पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे. प्लास्टिकचा वापर टाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे. स्नेहबंध सोशल फौंडेशन समाजामध्ये पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि जनजागृतीचे विविध उपक्रम सातत्याने राबवत असून, भविष्यातही अशा अभियानांद्वारे नागरिकांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न सुरू राहील.

या प्रसंगी उपस्थितांनी प्लास्टिकचा वापर कमी करण्याची व पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याची प्रतिज्ञा केली. स्नेहबंधच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक करत पर्यावरण रक्षणासाठी अशा जनजागृती मोहिमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

## वऱ्हाडची ५२ पात्रे येणार नगरकरांच्या भेटीला

### कलाकार कट्टाचे आयोजन, रविवारी पुण्याच्या महिलांचे सादरीकरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी





**अहिल्यानगर–** वऱ्हाड निघालंय लंडनला या गाजलेल्या एकपात्री नाटकातील बबन्या, काशिनाथ, ज्युडी, जानराव, शास्त्री, वन्स, आत्या...अशी अनेकविध अफलातून पात्रे नगरकरांच्या प्रत्यक्ष भेटीला येणार आहेत. पुण्याच्या महिलांनी वऱ्हाड निघालंय लंडनला या एकपात्री नाटकाची बहुपात्री रचना केली असून, त्याचे सादरीकरण येत्या रविवारी (५ जुलै) सायंकाळी ६ वाजता सावेडीच्या माऊली सभागृहात होणार आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकाराने येथे स्थापन झालेल्या मा. आ. स्व. अरुणकाका जगताप कलाकार कट्टा या उपक्रमाच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त या अनोख्या नाटकाचे मोफत आयोजन जागरूक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी केले आहे.

वऱ्हाड निघालंय लंडनला हे डॉ. लक्ष्मण देशपांडे लिखित व दिग्दर्शित अत्यंत गाजलेले व लोकप्रिय मराठी एकपात्री नाटक आहे. या नाटकात लेखक डॉ. लक्ष्मण देशपांडे यांनी एकाच वेळी तब्बल ५२ वेगवेगळ्या भूमिका साकारल्या होत्या. प्रचंड हास्यकल्लोळ उडवणार्या या नाटकातील ही ५२ पात्रे पुण्याच्या शिवसागर रेसिडेन्सीमधील हौशी १६ महिला कलावंतांनी उभी केली आहेत. यातील काही महिला अहिल्यानगरमधीलही आहेत. उच्च विद्याविभूषित व आयटी क्षेत्रासह विविध उद्योग व्यवसायात कार्यरत महिलांनी नाटकाच्या आवडीपोटी या एकपात्री नाटकाचे बहुपात्री रुपांतरण केले आहे. त्याचे सादरीकरण नगरमध्ये होणार आहे. यावेळी आमदार संग्राम जगताप व आमदार अक्षय कर्डिले उपस्थित राहणार आहेत.

या नाटकासाठीच्या मोफत प्रवेशिका जुन्या कोर्टासमोर स्वागत झेरॉक्स, आनंदी बाजार गौरी झेरॉक्स, दिल्ली गेट अतुल पिंपरकर जन्म कुंडली, लंबोदर हॉटेल (भुतकरवाडी चौक), शिंगवी ज्वेलर्स (प्रोफेसर कॉलनी), स्वामी समर्थ मोबाईल (पारिजात चौक, गुलमोहोर रोड), महावीर कलेक्शन (मारुती मंदिर समोर मार्केट यार्ड) व मयुरी मॉल (आगरकर मळा) येथे तसेच प्रयोगाच्या वेळी माऊली सभागृहावरही मिळू शकतील. प्रथम येणार्यास प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. पहिल्या चार रांगा सन्मानिका धारकांसाठी राखीव आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क : सुहासभाई मुळे (मोबा.९८२३७२२२१२.

## नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या व ड्रेनेजच्या समस्येची आयुक्तांकडून प्रत्यक्ष पाहणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** कोठी परिसरातील गुलाबसिंह कंपाऊंड येथील नागरिकांना भेडसावत असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या व ड्रेनेजच्या समस्येची गंभीर दखल घेत अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिंदे यांनी दिलेल्या निवेदनानंतर आयुक्तांनी तातडीने घटनास्थळी भेट देत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कामे त्वरित पूर्ण करण्याचे आदेश दिले.

गुलाबसिंह कंपाऊंड परिसरात नगरपुणे महामार्गावरील पिण्याच्या पाण्याची मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे अनेक दिवसांपासून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होत नव्हता. नागरिकांकडून नियमित पाणीपट्टी भरली जात असतानाही पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याने परिसरात तीव्र नाराजी होती. याशिवाय ड्रेनेज लाईन तुंबल्यामुळे अस्वच्छता व दुर्गंधीची समस्या निर्माण झाली होती.

या दोन्ही गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिंदे यांनी अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन सादर करून तातडीने कारवाईची मागणी केली होती. या निवेदनाची दखल घेत आयुक्तांनी स्वतः गुलाबसिंह कंपाऊंड परिसरात भेट देऊन पाणीपुरवठा लाईन तसेच ड्रेनेज व्यवस्थेची पाहणी केली.

## केडगावच्या अंबिका विद्यालयातील अरुणा दरेकर व विलास भोंदे या शिक्षकांची सेवापूर्तीनिमित्त गौरव




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** रयत शिक्षण संस्थेच्या केडगाव येथील श्री अंबिका प्राथमिक व उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालयात उपशिक्षिका अरुणा तुकाराम दरेकर आणि उपशिक्षक विलास जगन्नाथ भोंदे यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरव करण्यात आला. अनेक वर्षे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या या दोन्ही शिक्षकांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संस्कारक्षम कार्याचा यावेळी मान्यवरांनी गौरव करत त्यांच्या समर्पित सेवेचे कौतुक केले.

रयत शिक्षण संस्थेचे माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव शिवाजीराव भोर, अंबादास गारुडकर, विठ्ठलराव दरेकर, ज्ञानदेव पांडुळे, कुंडलिकराव दरेकर, अर्जुन पोकळे, अशोकराव बाबर, अनिल साळुंखे, शौकतबाई तांबोळी, अलकाताई अनभुले, किसन सातपुते, महेश गुंड, भास्करराव महाडिक, पोपट शिंगवी, प्रशांत कोतकर, गोविंद कोतकर, गंगाधर लोंढे, कृष्णाजी थोरात, रावसाहेब सातपुते, रामदास येवले, रघुनाथराव लोंढे, मधुकर देशपांडे, अभयकुमार चव्हाण यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील आणि लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यालय, नातेवाईक, सहकारी शिक्षक आणि मान्यवरांच्या हस्ते अरुणा दरेकर व विलास भोंदे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांच्या प्रदीर्घ सेवेला दाद दिली.

प्रास्ताविकात प्राचार्य नवनाथ बोडखे यांनी दोन्ही शिक्षकांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, शिक्षक हा समाज घडविणारा शिल्पकार असतो. अरुणा दरेकर आणि विलास भोंदे यांनी आपल्या सेवाकाळात निष्ठा, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पणातून अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले. त्यांचा हा गौरव म्हणजे संपूर्ण शिक्षक समाजाचा सन्मान असल्याचे त्यांनी नमूद केले.

बाबासाहेब भोस यांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, रयतमधील शिक्षकांनी समाजाभिमुख शिक्षणाची परंपरा जोपासली आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच संस्थेच्या विकासासाठीही रयत सेवकांनी योगदान दिले आहे. सेवकांच्या पगारातील एक टक्का निधीतून उभारण्यात आलेल्या शैक्षणिक संकुलांच्या इमारती ही संस्थेच्या सामूहिक कार्यसंस्कृतीची साक्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात दादाभाऊ कळमकर म्हणाले की, रयत शिक्षण संस्था ही केवळ शैक्षणिक संस्था नसून समाज परिवर्तनाची चळवळ आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांवर आधारित शिक्षणपद्धतीमुळे ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली. आज संस्थेने भौतिक सुविधांसोबतच

## आरटीआय कमकुवत करण्याचा प्रयत्न म्हणजे लोकशाहीवर घाला – ॲड.गवळी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** माहितीचा अधिकार कायदा, २००५ हा भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ असून, शासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जनतेच्या माहितीच्या अधिकाराचे प्रभावी संरक्षण करणारा कायदा आहे. मात्र, महाराष्ट्र शासनाने माहिती अधिकार कायद्यांतर्गत लागू केलेले २०२६ चे नवीन नियम हे नागरिकांच्या मूलभूत लोकशाही अधिकारांवर गदा आणणारे असून, या नियमांमुळे माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक क्लिष्ट, खर्चिक आणि नागरिकांसाठी अडथळ्यांची ठरणार असल्याचा गंभीर आरोप पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आला आहे.

संघटनेने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या नव्या नियमांविरोधात आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. त्यांच्या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा देत, हे आंदोलन केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता देशभरातील लोकशाहीवादी शक्तींना एकत्र आणणारे राष्ट्रीय जनआंदोलन ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. लोकशाहीच्या रक्षणासाठी हा निर्णायक लढा ठरेल आणि याच आंदोलनातून लोकशाहीविरोधी धोरणांविरोधात व्यापक जनमत तयार होईल, असेही संघटनेने स्पष्ट केले आहे.

पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी सरकारच्या भूमिकेवर तीव्र टीका करताना सांगितले की, माहितीचा अधिकार हा केवळ कायदा नसून तो जनतेच्या हातातील लोकशाहीचा दिवा आहे. शासनाच्या कामकाजावर नागरिकांची नजर राहावी, भ्रष्टाचाराला आळा बसावा आणि प्रशासन जनतेपुढे उत्तरदायी राहावे, यासाठी माहिती अधिकार अत्यंत आवश्यक आहे. हा अधिकार कमकुवत करणे म्हणजे लोकशाहीच्या मुळावर घाव घालण्यासारखे असल्याचे त्यांनी नमूद केले.

# आत्याच्या मायेचे ऋण फेडण्यासाठी भाच्याकडून ७६ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । विशाल लोंढे**



**कोपरगाव–** आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी होत चाललेल्या जगात रक्ताच्या नात्यांमध्येही दुरावा निर्माण होत असल्याचे अनेकदा पाहायला मिळते. मात्र काही नाती अशी असतात, जी प्रेम, त्याग, माया आणि निस्वार्थ भावनेच्या बळावर आयुष्यभर टिकून राहतात. अशीच एक हृदयस्पर्शी घटना समोर आली असून, मुलगा-मुलगी नसतानाही एका आत्याने आपल्या भाच्याला स्वतःच्या मुलाप्रमाणे वाढवले, त्याला शिक्षण दिले, चांगले संस्कार घडवले, त्याच्या लग्नाची संपूर्ण जबाबदारी पार पाडली आणि आजही त्याचा प्रेमाने सांभाळ करत आहे. या निस्वार्थ मायेचे ऋण मान्य करत भाच्याने आपल्या आत्याचा ७६ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

शेवंताबाई लक्ष्मण बारसे यांना स्वतःची मुलगा किंवा मुलगी नसतानाही त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य भाचे देविदास धोंडीराम सोनवणे यांना घडवण्यासाठी समर्पित केले. लहानपणापासून त्यांनी त्यांचा स्वतःच्या मुलाप्रमाणे सांभाळ केला. त्यांच्या शिक्षणापासून ते चांगल्या संस्कारांपर्यंत प्रत्येक गोष्टीची जबाबदारी घेतली. पुढे त्यांचे लग्नही मोठ्या प्रेमाने करून दिले. एवढेच नव्हे तर आजही त्या त्यांचा प्रेमाने आणि आपुलकीने सांभाळ करत आहेत.

या मायेची आणि त्यागाची जाणीव ठेवत भाचे देविदास धोंडीराम सोनवणे यांनी आपल्या आत्याचा ७६ वा वाढदिवस अत्यंत दिमाखात साजरा केला. यानिमित्त डीजे, केक कापण्याचा कार्यक्रम तसेच उपस्थितांसाठी भोजनाची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा वाढदिवस आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. रक्ताच्या नात्यापेक्षा प्रेम, माया आणि संस्कार यांची नाती अधिक मजबूत असतात, याची प्रचिती देणारा हा प्रसंग अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, शेवंताबाई बारसे आणि देविदास सोनवणे यांच्या या नात्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# आयुर्वेदामुळे नागरिकांचे आरोग्य सुदृढ व निरोगी; आयुर्वेद हीच जीवन जगण्याची योग्य शैली – शेखर खोले

## आयुर्वेदिक रिसेलर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्याची विशेष सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** हजारो वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेले आयुर्वेद शास्त्र हे सुरक्षित, परिणामकारक आणि दुष्परिणाममुक्त आरोग्यपद्धती आहे. आयुर्वेदाच्या माध्यमातून अनेक आजारांपासून संरक्षण मिळू शकते आणि प्रत्येक व्यक्ती सुदृढ, निरोगी व आनंदी आयुष्य जगू शकते. त्यामुळे आयुर्वेदाचा अधिकाधिक अंगीकार करून त्याचा समाजात व्यापक प्रसार आणि प्रचार करण्याचा तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय विशेष सर्वसाधारण सभेत एकमताने घेण्यात आला. आयुर्वेद ही केवळ उपचार पद्धती नसून जीवन जगण्याची योग्य शैली आहे. आयुर्वेदामुळे शारीरिक व मानसिक व्याधींपासून दूर राहून उत्तम आरोग्य प्राप्त करता येते, असे प्रतिपादन आयुर्वेदिक रिसेलर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष शेखर खोले यांनी केले.

आयुर्वेदिक रिसेलर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य आयोजित विशेष सर्वसाधारण सभा अध्यक्ष शेखर खोले यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

यावेळी सेक्रेटरी चंद्रकांत भुसारी, उपाध्यक्ष अभिजीत दुबल, अरुण चौधरी, खजिनदार मुरलीधर कातोरे, सहसचिव स्वप्निल शहा, आशिष ठाकूर, विश्वस्त सुधाकर बोरुडे, अनिल गांधी यांच्यासह राज्यभरातील सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेदरम्यान औषध व सौंदर्यप्रसाधने अधिनियम १९४० आणि नियम १९४५ या महत्त्वपूर्ण विषयावर औषध प्रशासन सहाय्यक आयुक्त जावेद शेख, औषध निरीक्षक मुळे तसेच लॉ कॉलेजचे प्राचार्य एम. एम. तांबे यांनी उपस्थित सभासदांना सविस्तर कायदेविषयक मार्गदर्शन केले. त्यांनी औषध व्यवसायातील नियम, कायदेशीर जबाबदाऱ्या आणि बदलत्या तरतुदींबाबत माहिती देत शंकांचे निरसन केले.

यावेळी विश्वस्त सुधाकर बोरुडे म्हणाले की, असोसिएशनच्या नियमावलीत आवश्यक बदल करणे, राज्यभर आयुर्वेदाचा व्यापक प्रसार-प्रचार करणे, आयुर्वेदाबाबत जनजागृती वाढविणे यांसह विविध महत्त्वाचे विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

ते पुढे म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत आधुनिक उपचारपद्धतींच्या काही दुष्परिणामांना सामोरे जावे लागते; मात्र आयुर्वेद ही नैसर्गिक, सुरक्षित आणि दुष्परिणाममुक्त आरोग्यपद्धती आहे. आयुर्वेदामुळे जीवनशैलीमध्ये सकारात्मक बदल घडतो, ताणतणाव कमी होतो आणि निरोगी, आनंदी जीवन जगण्यास मदत मिळते. समाजामध्ये आयुर्वेदाचा प्रचार-प्रसार होणे ही काळाची गरज असून ग्राहकांपर्यंत आयुर्वेद शास्त्र पोहोचविण्याची महत्त्वाची जबाबदारी सभासदांवर आहे. आयुर्वेद हे प्राचीन आणि शास्त्रीय ज्ञान असून ते आधुनिक काळाशी सुसंगत पद्धतीने पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. असोसिएशनच्या माध्यमातून राज्यस्तरीय आयुर्वेद महोत्सव दरवर्षी उत्साहात आयोजित केला जात असून सभासदांना केंद्रस्थानी ठेवून संघटना अधिक सक्षम करण्याचे काम सातत्याने सुरू आहे, असे त्यांनी सांगितले.

# मतदार यादी पुनरीक्षणाला वेग; नगर शहरात बीएलओंच्या घरभेटी सुरू

## सकाळी ७ ते मध्यरात्रीपर्यंत बीएलओंची धावपळ; नागरिकांनी गणना प्रपत्र भरून सहकार्य करण्याचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहर विधानसभा मतदारसंघात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाला वेग आला असून, बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांच्या घरभेटींची मोहीम जोरात सुरू आहे. मतदार यादी अद्ययावत, अचूक आणि त्रुटीरहित करण्यासाठी बीएलओ सकाळपासून रात्री उशिरापर्यंत नागरिकांच्या घरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेत आहेत. मतदारांची ओळख, राहण्याचा पत्ता, आवश्यक कागदपत्रे तसेच इतर तपशीलांची पडताळणी करून माहिती संकलित केली जात आहे.

या मोहिमेत मोठ्या प्रमाणावर शिक्षक बीएलओ म्हणून कार्यरत आहेत. प्रशासनाच्या वतीने बीएलओचे काम करणाऱ्या शिक्षकांना कार्यमुक्तीचे आदेश दिले असले तरी अनेक शाळांमध्ये शिक्षक संख्या अत्यल्प आहे. त्यामुळे शिक्षकांना बीएलओचे काम करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी देखील शाळेतील अध्यापनाची जबाबदारी पार पाडावी लागत आहे. अनेक शिक्षक सकाळी सात वाजल्यापासून घराबाहेर पडून दिवसात काही वेळ शालेय कामकाज सांभाळत रात्री बारा वाजेपर्यंत मतदार पुनरीक्षणाचे काम करत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. त्यामुळे अध्यापन आणि मतदार पुनरीक्षण अशा दुहेरी जबाबदाऱ्या शिक्षकांवर पडल्या असून, त्यांची मोठी कसरत सुरू आहे.

मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत प्रत्येक मतदाराची माहिती अद्ययावत करणे, नवीन पात्र मतदारांची नोंद करणे तसेच मृत, स्थलांतरित किंवा अपात्र मतदारांची माहिती निश्चित करणे हे उद्दिष्ट आहे. यासाठी बीएलओंना नागरिकांच्या सहकार्याची अत्यंत आवश्यकता असून, घरभेटीदरम्यान आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, ज्या मतदारांकडून गणना प्रपत्र भरून दिले जाणार नाही किंवा आवश्यक माहिती उपलब्ध होणार नाही, अशा मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने ही प्रक्रिया गांभीर्याने घेत बीएलओंना वेळेवर माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

मतदानाचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी मतदार यादीतील माहिती अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे बीएलओ घरभेटीसाठी आल्यानंतर त्यांना योग्य माहिती देणे, आवश्यक कागदपत्रे दाखविणे आणि गणना प्रपत्र तातडीने भरून देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागातील सहा कर्मचारी सेवानिवृत्त; गौरव समारंभात सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागातील दत्तात्रय शिंदे, सदाशिव झिने, नानासाहेब कराळे, ज्ञानदेव जाधव, आरिफ सय्यद आणि संजय परदेशी हे कर्मचारी प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याबद्दल पाणीपुरवठा विभागाच्या वतीने त्यांचा भावपूर्ण सत्कार करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी जलअभियंता परिमल निकम, इंजि. गणेश गाडळकर, इंजि. महादेव काकडे, इंजि. राहुल गीते, इंजि. प्रदीप ढगे, अपाफ शेख, कैलास महामुनी यांच्यासह पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना जलअभियंता परिमल निकम म्हणाले की, सेवानिवृत्त झालेल्या या सर्व कर्मचाऱ्यांनी जवळपास चाळीस वर्षे महानगरपालिकेच्या माध्यमातून नगरकरांची निष्ठेने सेवा केली आहे. पाणीपुरवठा विभाग हा अत्यंत जबाबदारीचा आणि सतत दक्ष राहून काम करणारा विभाग आहे. या विभागातील कर्मचाऱ्यांनी कधीही वेळ, काळ किंवा परिस्थितीची पर्वा न करता आपल्या कर्तव्याला प्राधान्य दिले. शहरात कुठेही पाईपलाईन गळती, तांत्रिक बिघाड किंवा पाणीपुरवठ्याची अडचण निर्माण झाली की त्यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन काम पूर्ण केले आणि नागरिकांचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवला. कामातील तत्परता, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव हीच या सर्व कर्मचाऱ्यांची खरी ओळख असून त्यांनी महानगरपालिकेच्या माध्यमातून नगरकरांना अत्यंत चांगली सेवा दिली आहे. त्यांच्या योगदानाची नोंद कायम आदराने घेतली जाईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनीही आपल्या भावना व्यक्त करत महानगरपालिका आणि पाणीपुरवठा विभागाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या सेवाकाळात अधिकारी व सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आभार मानले.

तसेच सेवानिवृत्तीच्या निमित्ताने पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आयोजित केलेल्या सत्काराबद्दल त्यांनी मनःपूर्वक ऋण व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.

# वडगाव गुप्ता येथील वै.श्री संत बाळाजी बाबा पायी दिंडी सोहळ्याचे गुरुवार १६ जुलै रोजी पंढरपुरकडे प्रस्थान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील वडगाव गुप्ता येथील वै.श्री संत बाळाजी बाबा पायी दिंडी सोहळ्याचे गुरुवार दि. १६.०७.२०२६ रोजी सकाळी ८ वाजता पंढरपूर कडे प्रस्थान होणार आहे अशी माहीती वै.श्री. संत बाळाजी बाबा पायी दिंडी सोहळा ट्रस्ट च्या वतीने देण्यात आली. हा सोहळा प.पु.गु.जंगले महाराज शास्त्रीजी यांच्या कृपार्शीवादाने,वै.ह.भ.प.पोपट म. बोरकर व वै. ह.भ.प.किसन म. कदम यांच्या आशिर्वादाने व ह.भ.प.रामायणाचार्य अमोल महाराज सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ह.भ.प.आबासाहेब म.कोळसे व ह.भ.प.रविंद्र म.आव्हाड यांच्या समागमात चालतो.
यंदा दिंडीचे १७ वे वर्ष आहे.
दिंडीचे प्रस्थान झाल्यानंतर दिंडी अहिल्यानगर, तुक्कडओढा,रुईछत्ती सी,कोंभळी,कर्जत, वीट,आदिनाथ कारखाना,टेंभुर्णी,करकंब मार्गे पंढरपूर ला पोहचतो, दिंडी सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक सहभागी होत असतात. वाटेत ठिकठिकाणी वारकऱ्यांची अन्नदान पंगतीची व्यवस्था अन्नदाते मोठ्या श्रद्धेने करतात. ज्या भाविकांना दिंडी सोहळ्यात सहभागी व्हायचे



असेल त्यांनी ह.भ.प.दत्तात्रय म.शेवाळे, ह.भ.प.लक्ष्मण म.गव्हाणे, ह.भ.प.देवराम पवार सर, ह.भ.प.रमेश म.शेवाळे, ह.भ.प.डॉ. बापूसाहेब पवार, ह.भ.प.एकनाथ डोंगरे पा.,ह.भ.प. कृष्णा म. दांगट,ह.भ.प.संजय म.डोंगरे, ह.भ.प.प्रभाकर पवार मेजर, ह.भ.प.सोपान गव्हाणे, ह.भ.प.लक्ष्मण कदम,श्री.गणेश कि.डोंगरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन वै. श्री. संत बाळाजी बाबा पायी दिंडी सोहळा ट्रस्ट च्या वतीने केले आहे.

(पान १ वरून)

## ‘नो पार्किंग’च्या नावाखाली बेकायदेशीर दंडवसुलीचे रॅकेट?

वर्षी १ लाख, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी प्रत्येकी १.२५ लाख, चौथ्या वर्षी १.७५ लाख आणि पाचव्या वर्षी २ लाख अशी एकूण केवळ ७.२५ लाख रुपयांची रॉयल्टी निश्चित करण्यात आली. त्यामुळे मूळ कराराच्या तुलनेत महानगरपालिकेचे सुमारे १४.५० लाख रुपयांचे संभाव्य आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापुढे प्रशासकीय ठराव क्रमांक ७१७, दिनांक २० जानेवारी २०२६ द्वारे या सुधारित अटींनाही मान्यता देण्यात आली. विशेष म्हणजे, संबंधित ठेकेदाराने ज्या दराने रॉयल्टी देण्याची तयारी दर्शविली, त्याच दरांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आल्याने निर्णय प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मूळ निविदेत नसतानाही शहरातील आणखी आठ नवीन रस्त्यांवर पार्किंग शुल्क वसुलीची परवानगी देण्यात आली, १२ रस्त्यांलगत नो पार्किंग क्षेत्र घोषित करून तेथे कारवाई करण्याचे अधिकारही ठेकेदाराला देण्यात आला आहे. नो पार्किंग झोन निश्चित करण्याचे अधिकार महानगरपालिकेकडे नसताना अशा क्षेत्रांची घोषणा करून खासगी ठेकेदाराला वाहनांवर कारवाई करण्याचे अधिकार बहाल करण्यात आले. मोटार वाहन अधिनियम, १९८८ कलम ११७.१२७ नुसार सार्वजनिक रस्त्यावरून वाहन उचलणे, जप्त करणे, दंड आकारणे व वाहतूक नियमांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार केवळ वाहतूक पोलीस किंवा कायद्याने अधिकृत अधिकाऱ्यांनाच आहे. असे असताना खासगी ठेकेदारामार्फत वाहन उचलून नागरिकांकडून दंड व टोईंग शुल्काची वसुली केली जात असल्याने संपूर्ण कारवाईच्या कायदेशीरतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शहरातील विविध भागांतून उचलण्यात आलेली वाहने छत्रपती संभाजीनगर रोडवरील पोलीस अधीक्षकांच्या निवासस्थानालगत असलेल्या जुन्या शहर वाहतूक शाखेच्या जागेत ठेवली जात आहे. या जागेचा वापर कोणाच्या आदेशाने करण्यात आला, त्यासाठी पोलीस अधीक्षक यांच्या लेखी परवानगी आहे का,संबंधित क्रेन व वाहनांवर ‘‘शहर वाहतूक शाखा‘‘ असा उल्लेख कोणाच्या परवानगीने करण्यात आला, याशिवाय गृह विभाग व नगर विकास विभागाच्या शासन निर्णयांनुसार रस्त्यावरील बेवारस वाहनांबाबत स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा, टोल-फ्री क्रमांक व नियमानुसार कार्यवाहीची व्यवस्था उभारणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही नागरिकांकडून वसूल करण्यात आलेल्या सर्व दंड व टोईंग शुल्काचे विशेष लेखापरीक्षण करण्यात यावे, रॉयल्टी कपातीमुळे व इतर निर्णयांमुळे शासन महसुलाचे झालेले संभाव्य नुकसान निश्चित करून संबंधित अधिकारी व ठेकेदाराकडून त्याची वसुली करण्यात यावी, संपूर्ण निविदा प्रक्रिया व प्रशासकीय निर्णयांची एसीबीमार्फत चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्यात यावी तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत वाहन उचलणे, दंड आकारणी व टोईंग शुल्क वसुलीची संपूर्ण प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्यात यावी, अशी मागणी शेख यांनी केली आहे.

## राज्य सरकार सकारात्मक, तज्ञ समितीचा अहवाल मागवणार

मार्ग पहिल्या प्रस्तावित मार्गानूसारच कार्यान्वित करावा अशी आग्रही मागणी करताना हा मार्ग पुणे, नाशिक, अहिल्यानगर या जिल्ह्यांच्या कृषी व औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. अशी भूमिका मांडली यापुर्वी या मार्गासाठी भूसंपादनही करण्यात आले आहे. मात्र मार्गासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यात केलेले बदल प्रतिनिधींना विश्वासात न घेता करण्यात आल्याची बाब चर्चेदरम्यान मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. या रेल्वे मार्गाबाबत राज्य सरकार सकारात्मक असून, यासाठी निधीचीही तरतुद केलेली आहे. परंतू तांत्रिक अडचणींमुळे या मार्गात बदल करण्याचा निर्णय झाला असला तरी, या प्रकल्पाची तांत्रिक अचुकता व कालबध्द अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी तज्ज्ञांची उच्चस्तरीय समिती स्थापन करुन, याबाबतचा अहवाल मागविण्यात येईल. समितीकडून येणा-या अहवालानूसार केंद्र सरकारकडे प्रस्तावित रेल्वे मार्गाबाबत आपण स्वत: पाठपुरावा करु अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिष्टमंडळाला दिली. राहुरी ते शनिशिंगणापूर या प्रस्तावित रेल्वेमार्गाला स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध असल्याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले. राहुरी ते शनिशिंगणापूर मार्ग जात असलेले क्षेत्र संपुर्ण बागायती आहे. त्यामुळेच शेतकरी जमीन देण्यास तयार होत नाहीत. राहुरी तालुक्यात यापुर्वी विविध प्रकल्पांसाठी जमीनीचे अधिग्रहण झाल्याची बाब निदर्शनास आणून देत प्रस्तावित रेल्वेमार्ग रद्द करण्याची विनंती मुख्यमंत्र्यांना निवेदनाव्दारे करण्यात आली. यावेळी आ.प्राजक्त तनपुरे, आ.विठ्ठलराव लंघे पाटील व आ. अक्षय कर्डिले हे उपस्थित होते.

## तहसील कार्यालयात महिला शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न; वेळेवर हस्तक्षेपाने अनर्थ टळला

शोभा कुदळे यांनी हे टोकाचे पाऊल कोणत्या कारणामुळे उचलले, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. प्रशासनाकडून त्यांची समजूत काढण्यात आली असून, घटनेची चौकशी सुरू आहे. दरम्यान, या घटनेमुळे तहसील कार्यालयातील सुरक्षाव्यवस्था आणि नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्याच्या प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

## ‘आरोप पत्रातून नाव वगळले’ तपासी अंमलदार यांचे स्पष्टीकरण बोलावले

यांचे न्यायालयात प्रलंबित असलेल्या फौजदारी प्रकरण नंबर ११६४/२०२३ मध्ये फिर्यादी सुशीला साहेबराव काते हिने निशाणी ३० वर दिलेल्या तक्रारी अर्जावर न्यायालयाने संपूर्ण वस्तुस्थिती समजावून घेऊन सदर गुन्ह्यातील तपाशी अंमलदार पोलीस हेड कॉन्स्टेबल एस बी आंधळे यांना नोटीस काढून त्यांचे स्पष्टीकरण बोलवले असून ते स्पष्टीकरण २१ जुलै २०२६रोजी न्यायालयात दाखल करण्याचा आदेश मुख्य न्याय दंडाधिकारी आर. एम. शेख मॅडम यांनी नुकताच केला आहे या महत्त्वपूर्ण प्रकरणात मूळ फिर्यादीतर्फे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. सुरेश लगड हे काम पहात आहे.

## अहिल्यानगर शहरात मोकाट कुत्र्यांची दहशत; एकाच दिवशी ३८ नागरिकांना चावा

ऋषिकेश ताठे, नितीन लिगडे, रवी दंडी, आनंद राठोड यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनानंतर अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करत सांगितले की, पिंपळगाव माळवी येथे मोकाट कुत्र्यांसाठी निवारण केंद्र उभारण्याचे काम सुरू असून प्रशासनाकडून तातडीने आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. एकाच दिवशी ३८ नागरिकांवर हल्ला; महापालिका आणखी मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का? शहरामध्ये काल पिसाळलेल्या कुत्र्याने अक्षरशः धुमाकूळ घालत ३८ नागरिकांना चावा घेतला. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संपत बारस्कर म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेत तीव्र आंदोलन करून मोकाट कुत्र्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या व्यथा मांडणे आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी आवाज उठवणे हे आमचे कर्तव्य आहे. मोकाट कुत्रे नागरिकांवर जीवघेणे हल्ले करत आहेत. यापूर्वीही एका निष्पाप बालकाचा कुत्र्यांच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आणखी एखादी दुर्दैवी घटना घडण्याची वाट महापालिका पाहत आहे का? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन येत्या आठ दिवसांत प्रभावी उपाययोजना न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आणखी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

(पान १ वरून)

## पारनेर-नगर मतदारसंघातील सिंचन प्रकल्पांना गती

कालवा अस्तरीकरणाच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जुन्नर तालुक्यातील कालवा दुरुस्ती तसेच पारनेर तालुक्यातील कि.मी. ४७ ते ७३ या लांबीच्या नव्या लाइनिंग प्रस्तावाची सद्यस्थिती तपासण्यात आली. दोन्ही प्रस्ताव अंतिम मंजुरीच्या टप्प्यावर असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. यावेळी पारनेर हद्दीतील अस्तरीकरणाला प्रशासकीय मान्यता मिळाल्याने संबंधित कामाची निविदा प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कार्यकारी संचालकांना दिले.पिंपळगाव जोगा डावा कालवा शिवडोह या महत्त्वाच्या कामाबाबतही बैठकीत चर्चा झाली. या कामासाठी पुढील पंधरा दिवसांत निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश देत आवश्यक असल्यास कायदा व सुव्यवस्थेची मदत घेऊन काम पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

पठार भागातील पुणेवाडी, राळेगणसिद्धी आणि जातेगाव येथील उपसा सिंचन योजनांबाबतही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. या योजनांसाठी पाणी उपलब्धतेचा दाखला मिळावा म्हणून प्रस्ताव संबंधित विभागाकडे सादर करण्यात आला असून, पाणी उपलब्धतेचा अहवाल प्राप्त होताच सर्वेक्षण व पुढील प्रशासकीय प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे ठरविण्यात आले.गोदावरी खोरे विकास महामंडळांतर्गत पिंपळगाव रोठा, वनकुटे आणि मांडवे खुर्द येथील लिफ्ट सिंचन योजनांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. या योजनांचे प्राथमिक सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्यासाठी यापूर्वीच कार्यादेश देण्यात आले असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. मात्र पाणी उपलब्धतेचा अंतिम अहवाल प्राप्त होणे बाकी असल्याने तो मिळाल्यानंतर पुढील प्रशासकीय प्रक्रिया व प्रत्यक्ष कामाला गती देण्याचे निर्देश देण्यात आले.

तांबडीकार, निमदरी, मोरवाडी आणि वारणवाडी येथील साठवण तलाव योजनांबाबतही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. या योजनांसाठी आवश्यक पाणी उपलब्धतेचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आले असून संबंधित विभागाकडून मंजुरी मिळाल्यानंतर सर्वेक्षण व पुढील काम तातडीने सुरू करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.
मांडओहळ कालवा अस्तरीकरणाच्या प्रस्तावाचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. या कामाचा अंतिम प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला असून प्रशासकीय मान्यता मिळताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.
या बैठकीत आमदार काशिनाथ दाते यांनी प्रत्येक कामाचा बारकाईने पाठपुरावा करत मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अडचणी मंत्री महोदयांसमोर प्रभावीपणे मांडल्या. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सिंचन योजनांना गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दुसरीकडे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्परतेने बैठक आयोजित केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना वेळेत कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिल्याने मतदारसंघातील महत्त्वाच्या सिंचन प्रकल्पांच्या पूर्ततेबाबत आशादायक वातावरण निर्माण झाले आहे.
अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

## आषाढी वारीनिमित्त जिल्ह्यात हजारो वारकऱ्यांसाठी चरणसेवा उपक्रम !

डॉ. शिवाजी काळे तसेच स्थानिक स्तरावर सरपंच गौतम पठारे, शिवाजी शेळके आणि वैभव रोडी यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या जास्तीत जास्त वारकऱ्यांनी या मोफत आरोग्यसेवा व चरणसेवा उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.